सी.एन.आर.क्र. एम.एच.डी.एच.०४०००६०३२०२४

<u>नि. दि. मु. क्र. ६८/२०२४ मधील नि. क्र. १५ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ याने त्याचे विरुद्ध झालेला 'विना कैफीयत' चा झालेला आदेश रद्द होवून कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकनकरीता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र. १ तर्फे विहीत मुदतीत कैफीयत सादर केली नसल्याने त्याचेविरुध्द दि. १०.०२.२०२५ रोजी प्रस्तुत दावा विना कैफियत चालविण्याबाबत आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. १ याने प्रस्तुत अर्जाचे कामी नमुद केलेले कारण म्हणजेच माहितगार विधीज्ञ यांना खुलासा दाखल करणेकामी आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त न झाल्याने व माहिती गोळा करण्यास विलंब झाल्याने मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही, हे कारण ते दाव्यामध्ये हजर होवुन विना कैफियत आदेश होईपर्यंतचा एकुण कालावधीचा विचार करता पुर्णत: संयुक्तिक वाटत नाही. परंतु, न्यायाचे कारणास्तव प्रस्तुत दाव्याचा गुणदोषांवर कायमपणे निकाल होण्याकरीता, प्रतिवादी क्र. १ याची कैफीयत अभिलेखावर असणे आवश्यक आहे, असे माझे मत आहे. नैसर्गिक न्याय तत्वांच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास, प्रतिवादी क्र. १ याला प्रस्तुत कामी म्हणणे मांडण्यास संधी देणे हे न्यायदानाच्या दृष्टीने अपरिहार्य ठरते. प्रतिवादी क्र. १ याला तशी संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होण्याची शक्यता दिसून येत नाही. उलटपक्षी, प्रकरण कायमपणे गुणदोषांवर निकाली होण्यास मदतच होईल व निष्कारण न्यायालयीन प्रकरणांची गुंतागुंत देखील वाढणार नाही. त्याचप्रमाणे, वादीस विलंबामुळे झालेल्या त्रासाचा विचारकरीता, त्यास योग्य तो खर्च देवून न्यायाचा समतोल राखता येईल असे माझे मत आहे. सबब, मी वरील चर्चित कारणांकरिता पुढील आदेश पारित करीत आहे :–

**<u>– आदेश –</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. १५ हा प्रतिवादी क्र. १ याने वादीस रु.३००/– (रक्कम रुपये तीनशे) इतका खर्च पुढील नेमले तारेखस किंवा तत्पूर्वी देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२) सदर खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १ याने वादीस वर म्हणल्याप्रमाणे दिल्यानंतर, त्याची कैफीयत अभिलेखावर घेण्यात यावी.

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2025.08.11 11:52:25 +0530

ठिकाण : दोंडाईचा (आदित्य घ. नाईक)
दिनांक : ०८/०८/२०२५ दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), दोंडाईचा.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – गणेश साईनाथ अहिरे. |
| न्यायालयाचे नांव | – दिवाणी न्यायालय क.स्तर, दोंडाईचा. |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – ११.०८.२०२५. |

स्वाक्षरित/–
लघुलेखक(श्रेणी–३)